# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्र. १५३-२३** **दिनांक :- १३/०५/२०२३**

## तामिळनाडु राज्यातील चेन्नई शहारातून मित्राचा खून करुन पळून गेलेल्या भुमिगत आरोपीतास ०५ वर्षानंतर अटक करण्यात वालीव पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश.

तामिळनाडू राज्यातील चेन्नई स्थित तम्बरम शहरातील टी - १९ केलमबक्कम पोलीस ठाण्यातील गुन्हा रजि. क्रमांक ५३२/२०१८ भा.द.वि.सं.कलम ३०२ अन्वये दाखल गुन्हयातील संशयीत आरोपीत रघू दूघई मंडळ रा. बिहार याचा तामिळनाडु पोलीस मागील ५ वर्षापासुन सातत्याने शोध घेत होते. नमुद आरोपीताच्या शोधार्थ तामिळनाडु पोलीसांना अनेक वेळा बिहार राज्यात शोध मोहिम राबविली होती. परंतु तामिळनाडु पोलीसांना आरोपीत रघु मंडळाचा शोध घेण्यात यश येत नव्हते.

दिनांक ११ मे २०२३ रोजी तामिळनाडू राज्य पोलीसांचे एक विशेष पथक संशयित आरोपीत रघू दूघई मंडळ याचे शोधार्थ वालीव पोलीस ठाण्यात दाखल झाले. त्याअनुषंगाने वालीव पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदारांनी संशयित आरोपीत रघू दूघई मंडळ याचा शोध घेण्याचे अनुषंगाने तामिळनाडु पोलीसांकडुन माहिती संकलीत केली. तसेच वालीव पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदारांनी स्वतःचे खब-यांचे जाळे सक्रिय करुन बातमीदाराने दिलेल्या माहितीचे आधारे आरोपीत रघु मंडल हा वसई पुर्वस्थित बफिंग कंपनीमध्ये काम करीत असल्याची माहिती प्राप्त केली. तदनंतर, स्वतःच्या मित्राच्या खुनाच्या गुन्हातील आरोपीत रघु मंडल यास वालीव पोलीसांनी यशस्वीपणे ताब्यात घेतले.

आरोपीत रघु मंडल याच्याकडे केलेल्या तपासात आरोपीत रघु मंडल व त्याचा मित्र अनिल चौधरी असे दोघे तम्बरम शहरातील टी - १९ केलमबक्कम पोलीस ठाण्याच्या कार्यकक्षेत बफिंग कंपनीत एकत्र काम करुन एकाच रुममध्ये एकत्र वास्तव्यास होते. परंतु कालांतराने रघु मंडल व त्याचा मित्र अनिल चौधरी दोघांमध्ये किरकोळ कारणांवरुन वाद होऊन त्यांचे आपसात भांडण झाले. सदर भांडणाचा रघु मंडलने मनात राग धरुन दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ रोजी रात्री ०९:०० वाजताच्या सुमारास अनिल चौधरी हा रघु मंडल सोबत रात्रीचे वेळी एकाच रुममध्ये एकत्र झोपलेला असतांना रघु मंडलने त्याचा मित्र अनिल चौधरी याचा धारदार चाकूने गळा कापून खुन केला. तदनंतर, आरोपीत रघु मंडलने अनिल चौधरीचा मृतदेह असलेल्या रुमला बाहेरुन लॉक लावून पळून गेला. तामिळनाडू पोलीसांना सदर खुनाच्या गुन्हाचे तपासात रघु मंडलने केलेल्या गुन्हयाचे सी.सी.टि.व्ही फूटेज प्राप्त झाले होते. त्याअनुषंगाने तामिळनाडु पोलीस रघु मंडलचा कसोशीने शोध घेत होते. सदर खुनाच्या गुन्हाचे गांभीर्य व संवेदनशीलता लक्षात घेऊन वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी केलेले मार्गदर्शनाखाली व सुचनेप्रमाणे वालीव गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी प्रस्तुत खुनाच्या गुन्हातील आरोपीत रघु दुधई मंडल यास यशस्वीरित्या ताब्यात घेऊन महत्वपुर्ण कामगिरी केली आहे.

सदरची कामगिरी श्रीमती पौर्णिमा चौगुले — श्रींगी पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, वसई, श्री. चंद्रकांत जाधव, सहाय्यक पोलीस आयुक्त नालासोपारा विभाग, तथा अति. कार्यभार तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, पो.नि. श्री. राहुलकुमार पाटील

(गुन्हे) तसेच गुन्हे प्रकटिकरण पथकाचे स.पो.नि. ज्ञानेश फडतरे, पो.हवा. मुकेश पवार, मनोज मोरे, सचिन दोरकर, राजेंद्र फड, सतीश गांगुर्डे व पो.अंम/अभिजीत गढरी यांनी पार पाडली आहे.

--------------ooooo--------------